आदेश

प्रअभूसं/कक्ष7:2/मुदतवाढ/ 2864 /2018.
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा
दिनांक :- 18/08/2018.

प्रति,

उपजिल्हाधिकारी (भूसंपादन)
(इमारत व दळणवळण)
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा.

विषय :- भूसंपादन प्रकरण क्रमांक 33/2008-2009/मौजे कोदरखेड ता. नांदुरा जि. बुलडाणा प्रकरणामध्ये कलम 11(1) खालील प्रारंभिक अधिसूचनेस 6 महिने मुदतवाढ मिळणेबाबत.

संदर्भ :- 1. उपजिल्हाधिकारी भूसंपादन इ व द यांचे पत्र क्रमांक कावि/भूसंपादन/इवद/ 528 /2018.
दिनांक ~~05/05/2018~~. 14/8/18

-*****-

उपरोक्त विषयांकित भूसंपादन प्रकरण आपल्या कार्यालयात सुरु असून, सदर प्रकरणांत भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 अन्वये कलम 11 (1) खालील अधिसूचना खालीलप्रमाणे प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

| | |
|---|---|
| राजपत्र | 17/08/2017 |
| वृत्तपत्र 1 दैनिक विश्वविजेता | 06/08/2017 |
| वृत्तपत्र 2 दैनिक प्रश्नकाल | 04/08/2017 |
| जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा | 01/08/2017 |
| उपविभागीय अधिकारी कार्यालय, जळगांव जामोद | 21/08/2017 |
| तहसिल कार्यालय, जळगांव जामोद | 07/08/2017 |
| तलाठी कार्यालय, इस्लामपुर | 11/08/2017 |
| ग्रामपंचायत कार्यालय, इस्लामपुर | 11/08/2017 |
| शासकीय संकेतस्थळ | 02/08/2017 |

त्यानुसार प्रारंभिक अधिसूचनेचा प्रसिध्दीचा दिनांक 21/08/2017 असा आहे. सदर प्रकरण दिनांक **20/08/2018** रोजी व्यपगत होत आहे. प्रस्तुत प्रकरण व्यपगत होण्याकरीता अल्पसा कालावधी उरलेला आहे. व बांधकाम क्षेत्र व एकुण क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात वाढ झाल्यामुळे झालेल्या वाढीबाबत तपासणी करणे आवश्यक असल्याचे उपजिल्हाधिकारी भूसंपादन (इवद) यांनी कळविले आहे. जेणकरून पुढील भूसंपादन प्रक्रियेमध्ये कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाही. त्यासाठी कालावधी लागणार आहे.

भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम 2013 मधील कलम 19 मधील पोटकलम 7 मधील परंतुकानुसार जर कालावधी वाढविण्याचे समर्थन करणारी परिस्थीती अस्तीत्वात असेल तर त्याला बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार आहे.

शासन अधिसूचना क्र. MIS-11/2014/CR-77(PART-2)/A-2 दिनांक 11 सप्टेबर 2015 अन्वये समुचित शासन म्हणून मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार, मी जिल्हाधिकारी, बुलडाणा भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करतांना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, 2013 मधील कलम 19 (7) नुसार भूसंपादन प्रकरण, क्रमांक 33/2008-2009/कोदरखेड ता.

Scanned by CamScanner

नांदुरा जि. बुलडाणा प्रकरणामध्ये कलम 11 (1) खालील अधिसूचनेस दिनांक 19/02/2019 पर्यंत 6 महिन्यांची पुढील अटी व शर्तीचे आधारे मुदतवाढ देण्यात येत आहे.

अटी व शर्ती :-

4. मुदतवाढीबाबत कलम 19 (1) चे अ ते ई प्रमाणे प्रसिध्दी करणे बंधनकारक राहील.
5. यंत्रणेने कलम 19 ची घोषणा करण्यापुर्वी आवश्यक रक्कम जमा करणे बंधनकारक राहील.
6. कलम 19 (7) नुसार ही मुदतवाढ अंतिम असेल. त्यामुळे सर्व विहीत कालावधीत कार्यवाही करणे भूसंपादन अधिकारी व यंत्रणेवर बंधनकारक राहील. सदर बाबत पुनश्च मुदतवाढ मिळण्याची तरतुद नाही.

स्वा-
जिल्हाधिकारी
बुलडाणा.

Scanned by CamScanner